**<u>ठळक बातम्या</u>**

- ‘एक राष्ट्र एक निवडणूक’ या संकल्पनेवर देशभरात चर्चा घडवून आणण्याचं प्रधानमंत्र्यांचं NCC च्या छात्र सैनिकांना आवाहन

- केंद्र सरकारकडून वेव्ह बाजार, वेव्ह पुरस्कार आणि वा उस्ताद चॅलेंजची घोषणा

- उत्तराखंडमध्ये आजपासून समान नागरी कायदा लागू

**आणि**

- ICC कडून जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह आणि स्मृती मानधनाला सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

देशात अनेक वेळा निवडणुका होत असल्यामुळे कामाचा वेग मंदावतो, त्यामुळे ‘एक राष्ट्र एक निवडणूक’ या संकल्पनेवर देशभरात चर्चा घडवून आणण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणांना केलं. नवी दिल्लीतल्या परेड मैदानावर आयोजित राष्ट्रीय छात्र सेनेच्या रॅलीला ते संबोधित करत होते. ‘युवा शक्ती, विकसित भारत’ अशी यंदाच्या रॅलीची संकल्पना होती. देशाच्या विकासात छात्रांच्या योगदानाचं यावेळी प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं. ते म्हणाले….

**होल्ड - बाईट - मोदी**

तरुणांना येणारे अनेक अडथळे मागच्या दहा वर्षात सरकारने दूर केल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. मुद्रा योजना, राष्ट्रीय शिक्षण धोरण, आणि शिष्यवृत्तीमुळे तरुणांना प्रगती करण्यास मदत झाली असंही ते म्हणाले. याप्रसंगी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ उपस्थित होते. यावेळी आठशे छात्रांनी

सांस्कृतिक कार्यक्रमाचं सादरीकरण केलं. या कार्यक्रमात १८ मित्र देशातील १४४ छात्र सहभागी झाले होते.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी आज दूरध्वनीवरुन चर्चा केली. ट्रम्प यांना विजयाबद्दल त्यांनी शुभेच्छा दिल्या. दोन्ही देशांच्या परस्पर हितासाठी कार्यरत राहण्याचा विश्वास मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्री आश्विनी वैष्णव आणि केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी आज नवी दिल्ली इथं ‘वेव्ज बाजार’, तसंच ‘वा उस्ताद चॅलेंज आणि वेव्ज पुरस्कार’चा प्रारंभ केला. यावेळी त्यांनी ‘वेव्ज २०२५’ चा एक भाग म्हणून ‘क्रिएट इन इंडिया चॅलेंज सिजन- वन’ साठी जागतिक सहभागाच्या निमंत्रणाचाही प्रारंभ केला. जागतिक मंचावर भारताला आपली समृद्ध संस्कृती, वारसा, आणि कथाकथनासाठी मोठं महत्व मिळत असल्याचं वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. भारत लवकरच सर्जक अर्थव्यवस्थेची राजधानी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

भारत ही कथाकथनाची भूमी असून वेव्ज अर्थात दृक् श्राव्य आणि मनोरंजन परिषद आणि इतर योजनांमुळे भारताची सुप्त शक्ती जगासमोर येईल, असं गजेंद्रसिंग शेखावत यावेळी म्हणाले. भारताची संस्कृती हेच खरं सामर्थ्य असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

<><><><><>

गुलेन बॅरी सिंड्रोम या आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं पथक पुण्यात दाखल झालं आहे. या ७

सदस्यीय पथकात राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण संस्था, भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, तसंच राष्ट्रीय विषाणू संस्थेतल्या तज्ज्ञांचा समावेश आहे.

या आजाराची लागण झालेल्या रुग्णांची संख्या आता १०१ झाली आहे. त्यातले ८१ पुणे महापालिका क्षेत्रात, १४ पिंपरी चिंचवड भागात, तर ६ इतर जिल्ह्यांमधले आहेत. याप्रकरणी २५ हजारांहून अधिक घरांची पाहणी महापालिकेनं केली आहे.

**<><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. या दरम्यान, जर एखाद्या विद्यार्थ्याकडे परीक्षेदरम्यान मोबाईल फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरण आढळलं तर पुढची दोन वर्षं परीक्षेला बसायला बंदी घालण्यात येणार आहे. पूर्वी अशा प्रकरणांमध्ये एका वर्षासाठी बंदी घालण्याची तरतूद होती. मात्र, आता ती वाढवून दोन वर्षं केल्याची माहिती सीबीएसईच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

**<><><><>**

सोयाबीन खरेदी करणाऱ्या प्रमुख पाच राज्यांना मागं टाकत महाराष्ट्रानं अव्वल स्थान मिळवलं आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. राज्यात नोंदणी झालेल्या सुमारे ७ लाख ६५ हजार शेतकऱ्यांपैकी ३ लाख ६९ हजार शेतकऱ्यांकडून ७ लाख ८१ हजार ४४७ मेट्रिक टन सोयाबीन खरेदी झाली आहे. ही खरेदी इतर राज्यांच्या तुलनेनं सर्वाधिक आहे. येत्या ३१ तारखेपर्यंत खरेदी चालू राहणार असल्यानं सोयाबीन खरेदीच्या आकडेवारीत मोठी वाढ दिसेल. गरज भासली तर केंद्र सरकारकडे खरेदीसाठी मुदत वाढवून मागीतली जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समान नागरी कायदा लागू करणारं उत्तराखंड हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.  उत्तराखंडचे  मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी आज डेहराडून इथं या कायद्यासंबंधीचे नियम आणि इतर माहिती देणाऱ्या पोर्टलचं उद्घाटन केलं. यावेळी स्वतःची नोंदणी त्यांनी या पोर्टलवर केली.  विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, आणि लिव्ह इन नातेसंबंधांसह अनेक बाबींमधे हा कायदा लागू झाला आहे. अनुसूचित जमातींना या कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आलं आहे. उपासना पद्धती, विवाहाच्या परंपरा यामुळं यात काहीही बदल होणार नाही. मात्र एकापेक्षा अधिक विवाह करण्यावर यामुळं निर्बंध आले आहेत. घटस्फोटाचे नियम सर्व धर्मांना यात समान असतील. या अंतर्गत २७ मार्च २०१० नंतर झालेल्या सर्व विवाहांची नोंदणी बंधनकारक आहे. तसंच लीव्ह इनची नोंदणीही बंधनकारक आहे. लीव्ह इन मधून जन्माला आलेल्या बालकांना विवाहातून जन्माला आलेल्या बालकांसारखेच अधिकार दिले जातील.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या आर जी कार रुग्णालयातील डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपीला देहदंडाची शिक्षा देण्याची मागणी करणाऱ्या पश्चिम बंगाल सरकारच्या याचिकेवरील निकाल कोलकाता उच्च न्यायालयाने आज राखीव ठेवला.

**<><><><><>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी आज चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांची बीजिंगमध्ये भेट घेतली. दोन्ही देशांमध्ये राजकीय, आर्थिक आणि इतर मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा पुन्हा सुरू करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर निर्णय झाला आहे. त्यानुसार ही चर्चा होत असल्याची माहिती मिसरी यांनी दिली. ते चीनच्या २ दिवसांच्या दौऱ्यावर आहेत.

**<><><><><>**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आपल्या मस्कत भेटीत आज, ओमानचे वाणिज्य, उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री कैस बिन मोहम्मद बिन मुसा अल युसेफ यांच्याबरोबर बैठक घेतली. या बैठकीत सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार, व्यापार, गुंतवणूक संबंध आणखी मजबूत करणं तसंच द्विपक्षीय भागीदारी आणखी दृढ करण्यावर चर्चा झाल्याचं गोयल यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. ११ व्या संयुक्त आयोगाच्या बैठकीसाठी गोयल आजपासून दोन दिवसांच्या मस्कत दौऱ्यावर आहेत.

**<><><><><>**

नौदलाचे प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी इंडोनेशियाच्या नौदलाचे प्रमुख ॲडमिरल मुहम्मद अली यांच्याशी दिल्ली इथं आज द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ करण्याविषयी यावेळी चर्चा झाली.

सहकार्य वृद्धिंगत करणं, तसंच चाचेगिरी आणि इतर बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्याविषयीही दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

लाओसमधल्या भारतीय दूतावासाने गोल्डन ट्रँगल सेझमधल्या सायबर गुन्हे केंद्रातून ६७ भारतीयांची सुटका केली आहे. या तरुणांना धमकावून आणि त्यांच्यासोबत गैरवर्तन करून त्यांना या गुन्ह्यांमध्ये सहभागी होण्यासाठी भाग पाडलं गेल्याचं दुतावासाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे. या तरुणांच्या सुटकेसाठी दुतावासाच्या अधिकाऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आणि त्यांची तिथून सुटका केली.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेनं २०२४करता सर्वोत्कृष्ट खेळाडूंची नावं जाहीर केली. भारताचा जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमरा याला सर्वोत्कृष्ट कसोटीपटू तर महिला क्रिकेटमधे डावखुरी फलंदाज स्मृती मानधना हिला एकदिवसीय सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून स्थान मिळालं आहे. पुरुषांच्या टी ट्वेंटी क्रिकेटमधे अर्शदीप सिंग सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला आहे.

जसप्रीत बुमराने गेल्या वर्षभरात १३ कसोटी सामन्यात ३५७ षटकात ७१ बळी मिळवले. भेदक यार्करचा मारा आणि सातत्यपूर्ण खेळ ही त्याच्या यंदाच्या कामगिरीची वैशिष्ट्यं ठरली. स्मृती मानधना ने गेल्या वर्षभरात १३ एकदिवसीय सामन्यांमधे मिळून ७४७ धावा करुन विक्रमाची नोंद केली. यात ४ शतकी खेळी होत्या. हा देखील महिला क्रिकेटमधला विक्रम आहे. तिच्या एकूण कारकिर्दीतल्या २४ सामन्यांमधे मिळून तिने यंदा १ हजार ३५८ धावा पूर्ण केल्या. पुरुषांच्या क्रिकेटमधे एकदिवसीय आणि टी ट्वेंटी प्रकारातला सर्वोत्कृष्ट संघाचा मान भारतीय संघानं पटकावला आहे.

**<><><><><>**

जागतिक परिस्थितीमुळे देशातल्या शेअर बाजारात आज पुन्हा मोठी घसरण झाली. त्यामुळे सेन्सेक्स ७६ हजार आणि निफ्टी २३ हजारांच्या महत्त्वाच्या पातळीखाली बंद झाले. दिवसअखेर सेन्सेक्स ८२४ अंकांनी घसरुन ७५ हजार ३६६ अंकांवर बंद झाला. निफ्टी २६३ अंकांनी कोसळून २२ हजार ८२९ अंकांवर बंद झाला.

**//<><><><><>//**